।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ।।

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# दत्ताजीराव कदम

## आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी

### कनिष्ठ महाविद्यालय विभाग

(स्थापना : १९६२)

# माहितीपत्रक

सन २०२०-२०२१





श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

# * संस्थेची प्रार्थना *

हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे
राम कृष्ण रहीम ख्रिस्त
बुध्द झरतुष्ट्र ।
महावीर मानवसंत मानव्याचे दीपस्तंभ
लीन दीन होऊन त्यांचे
वंदूया चरण ।
सत्य, शील, प्रामाणिकता,
त्याग पिळवणुकीस आळा
मानव्याचे अधिष्ठान
ईशतत्व दर्शन ।
यांचे ज्ञान नि विज्ञान हाच सुसंस्कार ।
विवेकाच्या आनंदाचा लाभ शिक्षणांत
हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे

– पूज्य बापूजी साळुंखे

अग्ने नय सुपथा राये अस्मान्
विश्वनि देव वयुनानि विद्वान ।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो
भूयिष्ठां ते नम उक्ति विधेम्॥

– ईशावास्योपनिषद्

।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ।।
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# दत्ताजीराव कदम
# आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी

**कनिष्ठ महाविद्यालय विभाग**

(स्थापना : १९७६)

## प्रास्ताविक :

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर**

महाराष्ट्राच्या आणि आपल्या देशाच्या शिक्षण क्षेत्रामध्ये भारतीय संस्कृतीच्या उदात्त परंपरेला अनुसरून शैक्षणिक कार्य करण्यासाठी नव्या ध्येयाच्या आणि जोमाच्या शिक्षक कार्यकर्त्यांना प्रेरित करून शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी जून १९५४ पासून या शिक्षण संस्थेचे कार्य सुरू केले.

बापूजींना भारतीय संस्कृतीचा आदर्श, स्वामी विवेकानंदात दिसला म्हणून या शिक्षण संस्थेला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था हे नाव देण्यात आले. सत्य, चारित्र्य, उदात्तता, त्याग आणि तपश्चर्या यांचे मूर्तिमंत प्रतिक म्हणजे स्वामी विवेकानंद हे प्रतिक समाज जीवनात टिकवून ठेवणे व वाढविणे समाजाला, देशाला आणि विश्वाला हितावह आहे. म्हणूनच शिक्षणाद्वारे ही आमची धडपड आहे. या हेतूच्या परिपूर्तीसाठी महाराष्ट्राच्या बारा जिल्ह्यात व कर्नाटक राज्यात १८० माध्यमिक विद्यामंदिरे, १ कन्या महाविद्यालय, २३ वरिष्ठ महाविद्यालये, ३ बी.एड. कॉलेजेस, ७६ उच्चमाध्यमिक विद्यालये, ८ ट्रेनिंग कॉलेजेस, १ विविधपयोगी व ४ पोस्ट ग्रॅज्युएटस् सेंटर्स व ४ टेक्निकल हायस्कूल, ७ गर्ल्स हायस्कूलस, २ नाईट हायस्कूलस, १ आश्रमशाळा, १ पोस्ट बेसिक आश्रम शाळा, १ प्रॅक्टिसिंग स्कूल, १ विस्तार सेवा केंद्र, १ बालविकास केंद्र, २ विधी छानमी महाविद्यालये, ३० वसतिगृहे हे एवढे प्रचंड कार्य संस्थेने उभे केले असून या सांस्कृतिक केंद्रामध्ये २ लाखांपेक्षा आधिक विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत. ७००० च्या वर गुरूदेव शिक्षक कार्यकर्ते अविरतपणे ज्ञानादााचे कार्य मोठ्या पावित्र्याने अनेक संकटांना तोंड देऊन करीत आहेत. महाराष्ट्राचे मँचेस्टर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या औद्योगिक शहारामध्ये शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेने या महाविद्यालयाची १९६२ साली स्थापना केली. स्थापनेपासून अनुभवी प्राध्यापक वर्ग लाभल्याने महाविद्यालयाने अल्पावधीतच आपली विशीष्ट अशी

उज्ज्वल परंपरा निर्माण करण्यात यश संपादन केले आहे.

१९९७ पासून आमच्या महाविद्यालयाचे नामकरण दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज असे झाले आहे. कै. दत्ताजीराव कदम हे इचलकरंजी नगरीचे भाग्यविधाते. सहकाराची साथ घेऊन त्यांनी इचलकरंजी नगरीच्या सूत व्यवसायास एक भव्य रूप प्राप्त करून दिले. सामन्य कामगारापासून ते खासदरकीपर्यंत त्यांच्या जीवनाची वाटचाल आजच्या तरूणाला बोधप्रद आहे. आमच्या मातृसंस्थेच्या उपाध्यक्षपदीही त्यांची निवड झाली होती. अशा या सहकार महर्षीच्या कार्यकर्तृत्वाला आदरांजली वाहणारा हा एक अल्प प्रयत्न आमच्या मातृसंस्थेने केला व शिवाजी विद्यापीठाने साथ देऊन महाविद्यालयाच्या नावातील बदलास परवानगी दिली.

इचलकरंजीतील औद्योगिक वसाहतीच्या समोर इचलकरंजी–कोल्हापूर रोडला लागूनच संस्थेच्या मालकीच्या प्रशस्त वास्तूमध्ये हे कनिष्ठ महाविद्यालय सुरू केलेले आहे व त्याचा इन्डेक्स नंबर J 23.06.001 आहे.

नविन शैक्षणिक वर्षात आर्ट्स, सायन्स व कॉमर्सचे एफ.वाय.जे.सी. व एस.वाय.जे.सी. (इयत्ता अकरावी व बारावी) हे वर्ग ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक वर्गात विद्यार्थी संख्या ही सरकारी आदेशानुसार असल्यामुळे विशिष्ट मुदतीच्या आत आलेल्या प्रवेश अर्जाची शासन नियमानुसार समितीमार्फत निवड करून गुणवत्तेनुसार प्रवेश निश्चित केला जाईल. मात्र काही जागा राखीव राहतील.

**शिक्षणक्रम** – इ. ११ वी व १२ वी चे वर्ग

**अभ्यासक्रम** – इ. ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना दोन अनिवार्य भाषा विषय आणि चार ऐच्छिक विषय अशा सहा विषयांची निवड करावी लागेल.

| | कला | वाणिज्य | विज्ञान |
|---|---|---|---|
| अनिवार्य | १. इंगजी<br>२. पर्यावरण<br>३. आरोग्य व शारि.शिक्षण | १. इंग्रजी<br>२. पर्यावरण<br>३. आरोग्य व शारि.शिक्षण | १. इंग्रजी<br>२. पर्यावरण<br>३. आरोग्य व शारि.शिक्षण |
| ऐच्छिक | १. मराठी/हिंदी/संस्कृत<br>२. इतिहास<br>३. भूगोल<br>४. अर्थशास्त्र<br>५. राज्यशास्त्र/समाजशास्त्र | १.मराठी/हिंदी<br>२. अकौंटन्सी<br>३. व्यापार संघटन व व्यवस्थापन<br>४. अर्थशास्त्र<br>५. सहकार/गणित/ चिटणीस व्यवसाय | १. मराठी/हिंदी/माहिती तंत्रज्ञान<br>२. भौतिकशास्त्र<br>३. रसायनशास्त्र<br>४. जीवशास्त्र/कॉम्प्युटर साय./ इलेक्ट्रानिक्स<br>५. गणित व संख्याशास्त्र |

**टीप :**

१) इ. १२ वी विज्ञान विद्यार्थ्यांना ऐनवेळी परीक्षा फॉर्म भरताना विषय बदलता येणार नाही.

२) वर्गांना संस्कृत विषयाची सोय उपलब्ध आहे.

३) कॉमर्स इ. ११ वी १२ च्या विद्यार्थ्यांना गणित हा विषय घेता येईल.

४) वैद्यकीय व इंजिनिअरींग प्रवेश परीक्षेच्या (MHT, CET) मार्गदर्शनाची विशेष सोय आहे.

५) इ. ११ वी माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) विषय घेतल्यास इ. १२ वी साठी तो विषय घ्यावाच लागेल. शिकविण्याचे माध्यम - विज्ञान शाखेचे सर्व विषय इंग्रजीमधून शिकविले जातात. कॉमर्ससाठी मराठी/इंग्रजी माध्यमातून शिकविण्याची सोय आहे. आर्टस साठी मराठी माध्यमच राहील. इंग्रजी माध्यमासाठी ५० विद्यार्थी प्रविष्ठ झालेस स्वंतत्र वर्ग सुरू होतील.

६) इ. ११ वी विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर सायन्स हा इलेक्ट्रॉनिक्स विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना द्वितीय भाषा व आय.टी. हे विषय घेता येणार नाही.

## विविध परीक्षा व टेस्ट ट्युटोरियल्सचे वार्षिक नियोजन

इ. १२ वी आर्टस, सायन्स व कॉमर्सच्या पाच चाचणी परीक्षा घेतल्या जातील.

| वर्ष | परीक्षेचे नांव | संभाव्य तारखा | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| इ. १२ वी | चाचणी क्र. १ | २५ जून ते ३० जून २०२० | जून अखेर |
| इ. ११ वी | स्वाध्याय/चाचणी क्र.१ | २७, २८, २९ जुलै २०२० | जुलै अखेर |
| इ. १२ वी | चाचणी क्र. २ | २७, २८, २९ जुलै २०२० | जुलै अखेर |
| इ. ११ वी | स्वाध्याय/चाचणी क्र.२ | २१, २२, २३ सप्टेंबर २०२० | सप्टेंबर अखेर |
| इ. ११/१२ वी | सत्र परीक्षा-१ | १० ऑक्टोंबर पासून पुढे | ऑक्टोंबर अखेर |
| इ. ११ वी | स्वाध्याय/चाचणी क्र.३ | २१, २२, २३ डिसेंबर २०२० | डिसेंबर अखेर |
| इ. १२ वी | पूर्व परीक्षा | २७ डिसेंबर २०२० च्या पुढे | संपूर्ण वर्षाचा |
| इ. ११ वी | स्वाध्याय/चाचणी क्र.४ | १५, १६, १७ फेब्रुवारी २०२१ | फेब्रुवारी अखेर |
| इ. ११ वी | सत्र परीक्षा - २ | २० मार्च २०२१ च्या पुढे | दुसऱ्या सत्रातील संपूर्ण |

**इ. १२ वी सायन्सच्या परीक्षांचे वेळापत्रक खालील प्रमाणे राहील.**

| परीक्षा | तारीख | मार्क | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| चाचणी-१ | २७ ते २९ एप्रिल २०२० | प्रत्येक विषय २० गुण | मार्च व एप्रिल अभ्यासक्रम |
| चाचणी-२ | २८ ते ३० जुलै २०२० | प्रत्येक विषय ३५ गुण | २७ जुलै अखेर अभ्यासक्रम |
| सहामाही परीक्षा | १२ ते २२ ऑक्टों. २०२० | सहा. परीक्षा बोर्ड नियम | ११ ऑक्टो. अखेर अभ्यासक्रम |
| पूर्व परीक्षा (सर्व विद्यार्थ्यांसाठी) | २८ डिसें. २०२० ते १४ जानेवारी २०२१ | बोर्ड नियमानुसार | संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित |
| सराव परीक्षा-१ (स्कॉलर बॅचसाठी) | १४ ते २५ जानेवारी २०२१ | बोर्ड नियमानुसार | संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित |
| सराव परीक्षा-२ (स्कॉलर बॅचसाठी) | २७ ते ३१ जानेवारी २०२१ | बोर्ड नियमानुसार | संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित |
| पूर्व परीक्षा (प्रॅक्टि.) | १ ते ५ फेब्रुवारी २०२१ | बोर्ड नियमानुसार | संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित |
| तोंडी परीक्षा | ११ ते २६ फेब्रुवारी २०२१ | बोर्ड नियमानुसार | संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित |

| | |
|---|---|
| ०५ ते २० फेब्रुवारी | १२ वी बोर्ड प्रॅक्टिकल परीक्षा/तोंडी परीक्षा |
| २० फेब्रुवारी ते २८ मार्च | १२ वी बोर्ड थेअरी परीक्षा |

## विद्याशाखा बदलण्याबाबत (Change of Faculty) -

विद्याशाखा बदल व विषय बदल यांच्या तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत –

१) कोणत्याही परिस्थितीत आर्टस/कॉमर्स शाखेकडून सायन्स शाखेकडे प्रवेश मिळविता येत नाही.

२) इ. ११ वी च्या वर्गात घेतलेल्या अनिवार्य भाषांमध्ये विद्यार्थ्यास इ. १२ वी च्या वर्गात बदल करता येत नाही.

३) इ. ११ वी ला जे विषय निवडले असतील तेच इ. १२ वी ला घ्यावे लागतील.

४) इ. ११ वी सायन्स वर्गात प्रवेश घेण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यास एस.एस.सी. च्या (इ. १० वी च्या) बोर्डाच्या नियमाप्रमाणे परीक्षेत सायन्सच्या सर्व विषयात किमान ४०% गुण मिळाले असले पाहिजेत. अन्यथा त्याला प्रवेश घेता येणार नाही. मागासवर्गीयांना देखी हीच अट लागू आहे.

५) ऐच्छिक विषय निवडताना (B.A./B.Sc./B.Com.) ह्या वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी कोणते विषय आवश्यक व महत्वाचे असतात याचा देखील विचार करावा.

## प्राध्यापक वर्ग -

वेगवेगळे विषय शिकविण्यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञ, प्रदीर्घ अनुभव असलेले, आपापल्या विषयात पारंगत असलेले व विद्यार्थीप्रिय प्राध्यापक अध्यापनाचे कार्य करीत आहेत.

## विद्यार्थी सहायक निधी (Student Aid Fund) -

गरीब, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी सहायक निधी मधून क्रमिक पुस्तके खरेदी करणे, परीक्षा फी भरणे इत्यादींसाठी आर्थिक सहाय्य मिळते. हे सहाय्य विद्यार्थ्यांची प्रगती व वर्तन ह्या गोंष्टींवर अवलंबून असते. सर्व शिष्यवृत्त्या, फी सवलती कॉलेजमधील विद्यार्थी सहाय्य निधी वेळापत्रक, पुस्तकांच्या याद्या इत्यादींची माहिती वेळोवेळी सूचना फलकावर लावली जाते. यासाठी विद्यार्थ्यांनी सूचना फलक दररोज पाहणे आवश्यक आहे. तसेच याकामी काही अडचण व शंका आल्यास कॉलेजकडून मार्गदर्शन मिळवावे.

## कॉलेज ग्रंथालय (College Library) -

कॉलेजचे सुसज्ज ग्रंथालय सर्व विषयातील क्रमिक पुस्तके व संदर्भ ग्रंथांनी परिपूर्ण आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ग्रंथालयाचे वेगवेगळे विभाग पाडण्यात आलेले आहेत.

१) **पाठ्यपुस्तक विभाग :** या सर्व विषयांची महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाने मान्यता दिलेली सर्व पाठ्यपुस्तके आहेत. (इ. ११ वी व १२ वी च्या आर्टस, सायन्स व कॉमर्स शाखांसाठी)

२) **डॉ. होमी भाभा पुअर बॉईज लायब्ररी :** यात प्रामुख्याने विज्ञान विषयाची पुस्तके आहेत.

३) **अभ्यासिका विभाग :** यात क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ यांचा समावेश असतो. या पुस्तकांचा लाभ विद्यार्थी व विद्यार्थीनींना कॉलेज परिसरात संध्याकाळी ६ वाजेपर्यंत करता येईल.

४) **पुस्तक पेढी विभाग :** यामधून गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे संच १/४ किंमतीत १ मार्चपर्यंत वारपरण्यास दिले जातात. अभ्यासिकेचा व पुस्तक पेढीचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या दृष्टीने उपयोगी पडतील अशी टिपणे तत्पूर्वी तयार करावीत. पुस्तकपेढी संबंधीचे नियम योग्य वेळी सूचना फलकावर लावले जातात.

**ग्रंथालयाचे नियम :**

१. विद्यार्थ्यास कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला म्हणजे तो ग्रंथालयचा सभासद होण्यास पात्र ठरतो.

२. ओळखपत्र (Identity Card) बरोबर आणल्याशिवाय ग्रंथालयात प्रवेश मिळणार नाही.

३. प्रत्येक विद्यार्थ्यास शैक्षणिक वर्षासाठी एक अहस्तांतरणीय लायब्ररी तिकीट देण्यात येते. (जर हे तिकीट हरवले तर पाच रूपये भरून दुसरे तिकीट मिळविता येते.)

४. ग्रंथालयातील पुस्तके मिळविण्यासाठी प्रत्येक वर्गाकरिता विशिष्ट दिवस निश्चित केलेले असतात. आधी नेलेली पुस्तके या निश्चित केलेल्या दिवसापूर्वी एक दिवस आधी ग्रंथालयात जमा करणे आवश्यक आहे.

५. विद्यार्थ्यास आठवड्याकरिता पुस्तक देण्यात येते. जर एक आठवड्यात पुस्तक परत केले नाही तर पुढील प्रत्येक दिवसाकरिता एक रूपया प्रमाणे दंड भरावा लागेल.

## प्रयोगशाळा (Laboratory) -

महाविद्यालयातील प्रयोगशाळा प्रशस्त व सर्व अद्ययावत साधनांनी परिपूर्ण सुसज्ज आहेत. प्रात्यक्षिकांच्यावेळी व्यक्तिगत लक्ष दिले जाते.

## व्यक्तिगत मार्गदर्शन –

विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येबरोबर शिक्षणाचा दर्जा खालावू नये, म्हणून विशेष काळजी घेण्यात येते. यासाठी विद्यार्थ्याकडे व्यक्तिगत लक्ष देण्यात येते. शिक्षक व विद्यार्थी यांच्यात जवळीक निर्माण व्हावी म्हणून प्रयत्न करण्यात येतात. यासाठी मार्गदर्शन करणे तसेच स्टडी प्रोग्रॅम, सेमिनार, चर्चामंडळे, प्राध्यापक-पालक संघ यासारख्या योजना राबविल्या जातात आणि विद्यार्थ्यांच्या अडचणी तात्काळ सोडविण्यात येतात. इंग्रजी विषयाच्या अभ्यासासाठी खास व्यवस्था म्हणून इंग्रजी शिकविण्याच्या आधुनिक पध्दतीचा वापर केला जातो.

टीप : कोणत्याही वर्गात प्रवेश देण्याबाबतचे अथवा प्रवेश नाकरण्याचे अंतिम अधिकार प्राचार्यांना राहील.

## ओळखपत्र (Identity Card) -

इ. ११ वी १२ वी च्या प्रत्येक विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र (Identity Card) असणे आवश्यक आहे. ते गळ्यात असणे आवश्यक आहे. ओळखपत्रावर लावावयाच्या विद्यार्थ्यांच्या फोटो विषयी पुढील सूचना लक्षात घ्याव्यात.

१. फोटो काळा पांढारा किंवा रंगीत चालेल.

२. फोटोचा आकार ५ से.मी. x ३.७५ से.मी. असाच असावा.

३. फोटो जुना किंवा नेहमीच्या वेशाच्या पध्दतीपेक्षा वेगळा असू नये.

४. फोटो समोरून घेतलेलाच असावा.

५. फोटोमध्ये डोळ्यावर उन्हाचा चष्मा असू नये.

६. इ. ११ वी च्या विद्यार्थ्यांना दोन फोटो व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना ४ फोटो काढून ठेवावे लागतील. १ आयडेंडीसाठी, १ प्रवेश अर्जासाठी, २ बारावी बोर्ड परीक्षा रिसिटसाठी तसेच G.O.I./B.C. विद्यार्थ्यांना एक जादा फोटो काढावा लागेल. डुप्लिकेट ओळखपत्रासाठी ॲफेडेव्हिट करावे लागते व रू. ५०/- इतकी जादा फी भरावी लागेल.

**प्रत्येक वर्षी ओळखपत्राचे नूतनीकरण वेळेत करून घ्यावे लागेल.**

ग्रंथालय, क्रीडा विभाग, शारिरीक शिक्षण, एन.सी.सी. इ. विषयांची माहिती वेळोवेळी सूचना फलकावर लावली जाईल. विद्यार्थ्यांनी दररोज सूचना फलक पहावेत. सूचना फलक न वाचल्यामुळे जर एखाद्या विद्यार्थ्याचे शैक्षणिक वा आर्थिक नुकसान झाले तर त्याला महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

## महाविद्यालयीन वेळ –

आर्टस व कॉमर्सचे वर्ग सकाळी ७.३० ते १२.३० या वेळेत तर सायन्सचे वर्ग सकाळी १०.१५ ते ५.१५ या वेळेत चालतील. प्रशासकीय कारणास्तव कनिष्ठ वाणिज्य विभागाची वेळ दुपारच्या सत्रात घेतले जाण्याची शक्यता आहे.

**कार्यालयीन वेळ :** सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० अशी राहील.

**कार्यालयात पैसे भरण्याची व घेण्याची वेळ :** सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.०० ते १.०० पर्यंत.
शनिवार सकाळी १०.०० ते १२.०० पर्यंत

**ग्रंथालयाची वेळ :** सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत

**शिक्षणक्रम :** पहिले सत्र १ ऑगस्ट २०२० ते ३१ डिसेंबर २०२०
दुसरे सत्र १ जानेवारी २०२१ ते ३० जून २०२१

## कॉलेजचे नियम (सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनीसाठी) –

१) शिस्त व अभ्यास यासाठी कॉलेजने वेळोवेळी केलेल्या नियमांचे पालन सर्व विद्यार्थी वर्गास करावे लागेल.

२) कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यापासून आठ दिवसांचे आत प्रत्येक विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र Identity Card असणे आवश्यक आहे. ओळखपत्र न दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांची गंभीर दखल घेण्यात येईल. ओळखपत्र जवळ असल्याशिवाय कोणत्याही विद्यार्थ्यास कॉलेज आवारात प्रवेश करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

३) प्राचार्यांच्या संमतीशिवाय विद्यार्थ्यास तासांना, शास्त्र प्रात्यक्षिकांना अनुपस्थित राहता येणार नाही. त्यांनी सर्व तासांना, शास्त्र प्रात्यक्षिकांना वेळेवर उपस्थित राहणे आवश्यक असते. तसेच सर्वच बाबतीत ८०%

पेक्षा जास्त हजेरी असणे आवश्यक असते. त्याशिवाय विद्यार्थ्यांला बोर्डाच्या किंवा महाविद्यालयाच्या परीक्षेला बसता येणार नाही.

४) वर्षातील सर्व स्वाध्याय, शास्त्र प्रात्यक्षिके, सहामाही परीक्षा, चाचणी परीक्षा, पूर्व परीक्षा यांना उपस्थित राहून विद्यार्थ्यांनी किमान ३५% गुण मिळविले पाहिजेत.

५) प्रत्येक विषयाचे स्वाध्याय व घटक चाचण्या घेतल्या जातील. त्यांचे निकाल वेळोवेळी जाहिर करण्यात येतील.

६) वर्ग चालू असताना विद्यार्थ्यांनी व्हरांड्यात, कॉलेजच्या आवारात रेंगाळू नये व इतर विद्यार्थ्यांना व वर्गांना आपल्या वर्तनाने कोणताही उपद्रव होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

७) कॉलेज, संस्था व इचलकरंजी शहर यांच्या प्रतिमेला, शिस्तिला बाधा येईल असे कोणतेही गैरवर्तन विद्यार्थ्याने कॉलेज आवारात वा बाहेर करता कामा नये. तसे आढळल्यास कडक कारवाई करण्यात येईल.

८) कॉलेजच्या सर्व कार्यक्रमांना विद्यार्थ्यांचे सहकार्य अपेक्षित असते. हेतूपुरस्कर असहकार्य करणाऱ्या विद्यार्थ्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

९) जे विद्यार्थी कॉलेज कार्यक्रमात बेशिस्त वर्तन करतील, कॉलेज मालमत्तेचे नुकसान करतील त्यांचे गंभीर दखल घेतली जाईल. त्यांना समज देऊन दंड करण्यात येईल.

१०) **विद्यार्थ्यांनी सूचना फलकात वेळोवेळी लावलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात, ही प्रत्येक विद्यार्थ्याची जबाबदारी राहील.**

११) उपलब्ध सायकल स्टँडवर स्वत:चे जबाबदारीवर सायकली व इतर वाहने ठेवावीत. त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

१२) प्रत्येक विद्यार्थी/विद्यार्थीनींनी ड्रेस कोड पाळणे बंधनकारक आहे.

## कॉलेजमधून नाव कमी करण्यासंबंधीचे नियम –

विद्यार्थ्यास एकदा कॉलेजमध्ये प्रवेश मिळाल्यानंतर जर त्यास प्रवेश रद्द करावयाचा असेल तर वडिलांच्या/पालकांच्या सहीचा तसा अर्ज कॉलेजमध्ये सादर करावा लागेल. अशा प्रकारचा अर्ज कॉलेजला सादर केला **तर विद्यार्थ्यास त्या सत्राची संपूर्ण फी भरावी लागेल.** ग्रंथालय, प्रयोगशाळा, कॉशनमनी आदी अनामत रक्कम कॉलेज पूर्ण:त सोडल्यानंतर सहा महिन्याचे आत अर्ज करून (पावतीसह) घेऊन जाव्यात अन्यथा रक्कम ऑडिट नियमान्वये बुडेल.

**परीक्षेचा प्रवेश –** (परीक्षा फॉर्म भरण्यास पात्र ठरण्यासाठी)

१) विद्यार्थ्याने वर्षातील किमान ७५% तासांना उपस्थित असले पाहिजे.

२) प्रत्येक सत्रासाठी नियुक्त केलेले स्वाध्याय, शास्त्र प्रात्यक्षिके पूर्ण केलेच पाहिजेत. प्रयोगवह्या (Journals) दिलेल्या मुदतीत प्रमाणित करून घेतल्या पाहिजेत.

३) वर्षातील सर्व परीक्षा, स्वाध्याय यांना उपस्थित राहून विद्यार्थ्याने किमान ३५% गुण मिळविले पाहिजेत.

४) जिमखान्याचे साहित्य परत केले पाहिजे.
५) ग्रंथालयातील पुस्तके परत केली पाहिजेत.
६) एन.सी.सी. मधील विद्यार्थ्यांचे वर्षातील एकूण संचलनापैकी किमान ८०% संचलने (Parades) समाधानपूर्वक पूर्ण केली पाहिजेत. तसेच एन.सी.सी. किटस (संपूर्ण साहित्य) सुस्थितीत परत केले पाहिजे.
७) कॉलेजची सर्व बाकी, फी, दंड इ. भरली पाहिजे. वरील बाबींची पूर्तता केल्याबद्दल त्या त्या विभागातील ना दाखले ऑफिसला सादर केले पाहिजेत. केवळ फी, परीक्षेचा फॉर्म भरला पाहिजे म्हणजे परीक्षेस बसता येईल असे नाही. परीक्षा फॉर्म भरून झाल्यानंतरही नियमित उपस्थिती, कॉलेजने घेतलेल्या परीक्षा, स्वाध्याय, प्रयोगवह्या आदि बाबतीत पूर्तता होत राहणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा परीक्षेस बसता येणार नाही.

## राष्ट्रीय छात्रसेना (एन.सी.सी.) –

कॉलेजला एक राष्ट्रीय छात्रसेना पथक असून त्यामध्ये एक कमिशन्ड ऑफिसर व दोन आर्मी इन्स्ट्रक्टर आहेत. सशक्त विद्यार्थ्यांना एन.सी.सी. त प्रवेश मिळतो.

## वाहन व्यवस्था –

विद्यार्थ्यांना घरापासून येण्याकरिता तसेच घरी परत जाण्याकरिता नियमित सोयीस्कर वेळात राज्य परिवहन मंडळाच्या बसेसची सोय आहे.

## विद्यार्थी मंडळ –

वर्ग प्रतिनिधीचे विद्यार्थी मंडळ राहील. सदरचे प्रतिनिधी प्राचार्य निवडतील.

### स्पोर्टस कौन्सिल (क्रीडा मंडळ) –

कॉलेजच्या क्रीडा मंडळाच्या मार्फत ज्युनिअर कॉलेजचे तालुका, जिल्हा, राज्य पातळीवरील सामने आयोजित केले जातील. चांगल्या खेळाडूंची वेगवेगळया क्रीडा समितीच्या कार्यवाहपदी नियुक्ती करण्यात येईल.

**विद्यार्थ्यांना खालील सवलती उपलब्ध असतात. त्यांची सविस्तर नोटीस वेळोवेळी लावली जाते ती पहावी. सवलतीसाठी आवश्यक कागदपत्रे प्रवेशावेळी सादर करावी.**

१) ई.बी.सी. फी सवलत
२) प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना फी सवलत
३) सैन्यातील जवानांच्या मुलांना फी सवलत
४) दुसऱ्या महायुध्दातील मृत/अपंग सैनिकांच्या पाल्याना सवलत

५) स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना सवलत व स्कॉलरशीप
६) मागासवर्गीय विद्यार्थी–विद्यार्थीनी शिष्यवृत्ती
७) विद्यार्थिनींना फी सवलत
८) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती
९) राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती
१०) राज्य सरकार गुणवत्ता शिष्यवृत्ती
११) हिंदी शिष्यवृत्ती
१२) शासकीय संस्कृत शिष्यवृत्ती
१३) अपंग विद्यार्थी शिष्यवृत्ती
१४) अल्पसंख्याक शिष्यवृत्ती

वरील व नविन येणाऱ्या शिष्यवृत्ती बाबतच्या सविस्तर सूचना नोटीस बोर्डावर लावल्या जातात. त्या पाहून अर्ज करावे लागतात. एका विद्यार्थ्यास एक शिष्यवृत्ती मिळते.

**अत्यंत महत्वाचे –**

इ. ११ वी मध्ये विनाअनुदानित वर्गात असलेल्या विद्यार्थ्यांनी (आय.टी., इलेक्ट्रॉनिक्स, कंम्पयुटर सायन्स) संस्थेने निश्चित केलेली फी भरली असणे आवश्यक आहे. इ. १२ वी मध्ये प्रवेश घेताना इ. ११ वी इतकीच प्रवेश फी भरावी लागेल.

## इ. ११ वी (एफ्.वाय.जे.सी.) परीक्षेचा निकाल लावण्यासंबंधी नियम –

सत्र परीक्षा पहिली, सत्र परीक्षा दुसरी व स्वाध्याय यांच्या प्रत्येक विषयातील गुणांची सरासरी काढून त्यानुसार इ. ११ वी वर्गाचा निकाल लावण्यात येतो. म्हणून इ. ११ वी वर्ग पास होण्याच्या दृष्टिने विद्यार्थ्याने परीक्षास, स्वाध्यायास उपस्थित राहून चांगले गुण मिळविणे फार महत्वाचे ठरते. जर विद्यार्थी या परीक्षास, स्वाध्यायास अनुपस्थित राहिला तर ते पुन्हा लिहून घेतले जाणार नाहीत. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. जर विद्यार्थी परीक्षेला बसला नाही तर अनुत्तीर्ण समजला जाईल.

**पालकांसाठी :** विद्यार्थ्याच्या वडीलास/पालकास कॉलेजच्या नियमांची माहिती आहे. तसेच कॉलेज वेळोवेळी जे नियम बनवील काही नवीन बदल करतील त्याची सुध्दा माहिती विद्यार्थी आपल्या वडीलांस/पालकास त्या त्या वेळी करून देईल असे कॉलेज गृहित धरते. त्याच प्रमाणे कॉलेज असे गृहित धरते की, वडिलांनी/पालकांनी हे माहितीपत्रक वाचले आहे व त्यातील नियम व सूचनांचे तंतोतंत पालन करण्याचे ठरवून पाल्यासाठी या कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्याचे ठरविले आहे.

**उत्तीर्ण विद्यार्थी–विद्यार्थीनींचे हार्दिक अभिनंदन!**

**कॉलेज प्रवेशासाठी स्वागत!**

**डॉ. आर. आर. कुंभार**
प्राचार्य

इचलकरंजी

## वार्षिक शुल्काचे विवरण

| अ.नं. | तपशील | इ.११ वी कला/वाणिज्य | इ.११ वी विज्ञान | इ.१२ वी कला/वाणिज्य | इ.१२ वी विज्ञान |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रवेश शुल्क | १६ | १६ | १८ | १८ |
| २ | शिक्षण शुल्क | १९२ | १९२ | २१६ | २१६ |
| ३ | सत्र शुल्क | ३२ | ३२ | ३६ | ३६ |
| ४ | प्रयोगशाळा शुल्क | | ७० | | ७० |
| ५ | नियतकालिका शुल्क | ५० | ५० | ५० | ५० |
| ६ | कॉलेज परीक्षा शुल्क | १५० | १५० | १५० | १५० |
| ७ | विद्यार्थी विकास सहाय्य निधी | १५ | १५ | १५ | १५ |
| ८ | एस.ए.फंड | १० | १० | १० | १० |
| ९ | विद्यार्थी सुरक्षा विमा | १० | १० | १० | १० |
| १० | आपत्कालीन निधी | १० | १० | १० | १० |
| ११ | जिमखाना शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| १२ | ई सुविधा | ११० | ११० | ११० | ११० |
| १३ | बोनाफाईड सर्टिफिकेट शुल्क | १० | १० | १० | १० |
| १४ | ध्वज निधी | १० | १० | १० | १० |
| १५ | विवेकानंद जयंती निधी | १० | १० | १० | १० |
| १६ | ट्युटोरियल्स शुल्क | ९० | ९० | | |
| १७ | ग्रंथालय अनामत | १० | १० | | |
| १८ | प्रयोगशाळा अनामत | | १५ | | |
| १९ | विकास निधी | ५० | ५० | ५० | ५० |
| २० | ओळखपत्र शुल्क | ५० | ५० | | |
| | एकूण रक्कम | ८७५ | ९६० | ८०५ | ८७५ |

## About reservation in admission for Backward class academic year 2020-2021

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Scheduled Caste | (SC) | 13% | Scheduled Tribe | (ST) | 7% |
| Vimuku Jati "A" | (VJA) | 3% | Nomadic Tribe "B" | (NTB) | 2.5% |
| Nomadic Tribe "C" | (NTC) | 2.5% | Nomadic Tribe "D" | (NTD) | 3.5% |
| Other Backward Class | (OBC) | 19% | ESBC | | 16% |
| | | | Open | Open | 33.5% |
| | | | **Total** | | **100%** |

The College/Institute admission authority has to reserve the seats for admission for Backward class candidates as per rules of the Govt. of Maharashtra up to the last date of admission.

## खास वैशिष्ट्ये

१) ५६ वर्षांची उच्च शैक्षणिक परंपरा
२) रिपीटर्संना प्रवेश नाही
३) अद्ययावत ग्रंथालय व प्रयोगशाळा
४) गरीब होतकरू विद्यार्थ्यांना खास सवलत
५) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना खास सवलत
६) कनिष्ठ महाविद्यालयाचे आर्टस व कॉमर्सचे वर्ग सकाळी ७.३० वा. आणि सायन्सचे वर्ग सकाळी १०.१५ वा. सुरू होतील.
७) क्रीडा, कला, साहित्य इत्यादी विभागाद्वारे व्यक्तिमत्व विकासास संधी
८) वार्षिक स्नेहसंमेलनातील गंभीर प्रकारची नोंद घेऊन स्नेहसंमेलन घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी व ज्यांना हे मान्य आहे अशाच विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयात प्रवेश घ्यावा. तसेच फनफेअर, फनीगेम्स, विविध गुणप्रदर्शन कार्यक्रम होणार नाही
९) वर्गप्रतिनिधी ची निवड शासकीय व विद्यापीठ नियमानुसार गुणवत्तेनुसार केली जाईल.
१०) शारीरिक, बौध्दिक क्षमता व मुलाखत यांद्वारे उत्तम विद्यार्थी स्पर्धा घेण्यात येते.
११) मेडिकल व इंजिनिअरींग प्रवेश परीक्षेसाठी ज्यादा (C.E.T.) मार्गदर्शनाची विशेष सोय
१२) इ. ११ वी १२ वी सायन्स व कॉमर्ससाठी माहिती तंत्रज्ञान हा विषय शिकविण्याची सोय उपलब्ध आहे.
१३) इ. ११ वी १२ वी सायन्ससाठी इलेक्ट्रॉनिक्स व कॉम्प्युटर विषयांची सोय
१४) विद्यार्थी सुरक्षा विमा सक्तीचा आहे.
१५) **विद्यार्थी व विद्यार्थिनींना ड्रेस कोड बंधनकारक आहे.**
१६) दरवर्षी इ. १२ वी विज्ञान शाखेत गुणनुक्रमे पहिल्या तीन विद्यार्थ्यांना व्होसकल्ले पारितोषिक १) रू. ५०१/-, २) रू. ३०१/-, ३) रू. २०१/- प्रा. सौ. एल. बी. व्होसकल्ले यांच्या उदार देणगीच्या ठेवीच्या व्याजातून. त्याशिवाय श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमार्फत गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना रोख रकमेची पारितोषिक
१७) क्रिकेट या खेळास प्राधान्य दिले जाणार नाही.

## महाविद्यालयात खालील अभ्यासक्रम शिकविले जातात.

१) इ. १२ वी सायन्स इलेक्ट्रॉनिक व कॉम्प्युटर (आय.टी. ची सोय यापूर्वी आहेच) मोफत पाठ्यपुस्तकांची सोय. या अभ्यासक्रमासाठी इ. १२ वी आर्टस, कॉमर्स व सायन्स या पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असणे अपेक्षित आहे.
२) बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन (B.C.A.) , (इ. १२ वी आर्टस, सायन्स, कॉमर्स पास झालेल्यांना प्रवेश)
३) एम.ए. (मराठी) व एम.ए. (हिंदी)
४) वरिष्ठ महाविद्यालयात सर्टिफिकेट कोर्स इन लायब्ररी सायन्स व बेसिक्स इन कॉम्प्युटर अँड आयटी हे कोर्स करता येईल.
५) B.C.A. यासाठी C.E.T. चे पूर्व तयारी वर्ग घेतले जातात.

## कॉलेजचे नियम

१) महाविद्यालयात गुणवत्तेनुसारच प्रवेश दिला जाईल.
२) विद्यार्थ्याने वर्षातील किमान ८०% तासांना उपस्थित असले पाहिजे
३) प्रत्येक सत्रासाठी नियुक्त केलेले स्वाध्याय व शास्त्रीय प्रयोग पूर्ण केलेच पाहिजेत
४) वर्षातील सर्व परीक्षांना व स्वाध्यायांना उपस्थित राहून विद्यार्थ्याने ३५% गुण मिळवले पाहिजेत
५) ग्रंथालयाकडून वर्षभरासाठी मिळणारे पुस्तक संच व इतर पुस्तके परीक्षेपूर्वी परत ग्रंथालयात आणून दिली पाहिजेत.
६) या महाविद्यालयात स्नेहसंमेलन साजरे केले जात नाही.
७) महाविद्यालयात विविध विषय मंडळे स्थापन केली आहेत. त्यांचे कार्यक्रम वर्षभर आयोजित केले जातात. या मंडळाच्या सभासदांना या कार्यक्रमात भाग घेता येईल. त्याची गरजेनुसार सभासद वर्गणी आकारली जाईल.
८) एन.सी.सी. मधील विद्यार्थ्यांस एन.सी.सी. ऑफिसर कडून वर्षातील एकूण संचलनापैकी ८०% संचलने समाधानपूर्वक पूर्ण केल्याबद्दल दाखला आणून दिला पाहिजे.
९) एन.सी.सी. किट (संपूर्ण साहित्य) सुस्थितीत परत दिल्याचा दाखला आणला पाहिजे.
१०) एन.सी.सी. मध्येदेखील झालेल्या विद्यार्थ्याने अपेक्षित कार्याची पूर्तता केल्याचा दाखला आणून दिला पाहिजे.
११) महाविद्यालयीन कोणत्याही वर्गात प्रवेश देण्याचे व प्रवेश नाकारण्याचे अंतिम अधिकार प्राचार्यांच्याकडेच राहतील. याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.
१२) विद्यापीठ व बोर्डाचा विद्यार्थी–सुरक्षा विमा सर्वांसाठी आवश्यक आहे.
१३) सहामाही, गृहपाठ, चाचणी परीक्षा यांबाबत महाविद्यालयाचे सर्व नियम मान्य करावेच लागतील. सहामाही, पूर्व परीक्षांना बसणे अनिवार्य आहे.
१४) विद्यार्थी व विद्यार्थिनींना ड्रेस कोड बंधनकारक आहे.
१५) महाविद्यालयाची बदनामी होईल अशा स्वरूपाचे कोणतेही वर्तन केल्यास सदर विद्यार्थ्यास कॉलेज मधून काढून टाकले जाईल.
१६) वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना महाविद्यालयाच्या सूचना फलकावर पहाव्यात.
१७) केवळ फी भरली म्हणजे परीक्षेस बसता येईलच असे नाही. फॉर्म भरून झाल्यानंतरही नियमित उपस्थित, परीक्षा, स्वाध्याय आदि बाबींची पूर्तता होत राहणे आवश्यक आहे.
१८) बुक बँकेतून १/४ किंमतीत वर्षभर पुस्तके वापरावयास मिळतील.
१९) रँगिंग करणारा विद्यार्थी आढळल्यास दंडात्मक कार्यवाही केली जाईल.
२०) महाविद्यालयाच्या आवारात मोबाईल वापरण्यास सक्त मनाई आहे.
२१) महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थ्याकडे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.
२२) महाविद्यालयामध्ये सायकल, मोटार सायकल पार्कींगची सोय मर्यादित आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपली वाहने आपल्या जबाबदारीवर लावावीत याची कृपया नोंद घ्यावी.

**डॉ. आर. आर. कुंभार**
प्राचार्य

# Junior College Teaching Staff List 2020-21

**Prin. Dr. R. R. Kumbhar**

### ♦ ENGLISH
Prof. Awate P. S.
Prof. Kadam B. D.
Prof. Kangralkar S. Y.
Prof. Mavali B. V.
Shri. Nidgunde S. S.

### ♦ MARATHI
Prof. Sawant N. M.
Prof. Surpuse M. B.
Prof. Gavali K. M.
Prof. Mane M. M.

### ♦ HINDI
Prof. Borage M. B.
Prof. Patil S. K.
Prof. Kulkarni V. N.

### ♦ HISTORY
Prof. Bhandare M. L.
Sou. Joshi S. S.

### ♦ SOCIOLOGY
Sou. Balwan R. J.

### ♦ GEOGRAPHY
Prof. Shirdhone R. B.
Prof. Patil D. H.

### ♦ POLITICAL SCIENCE
Shri. Valavi V. V.

### ♦ ECONOMICS
Prof. Sathe A. M.
Prof. Kokane C. P.
Prof. Mrs. Aarade A. V.

### ♦ COMMERCE
Prof. Patil H. B.
Prof. Chougule S. R.
Prof. Hitnale B. C.
Miss. Patil M. M.

## Faculty of Science

### ♦ PHYSICS
Prof. Jadhav D. B.
Prof. Patil C. C.
Smt. More D. P.

### ♦ CHEMISTRY
Prof. Patil M. B.
Prof. Miss. Panchbhai S. P.
Prof. More S. T.
Prof. Pawar M. K.
Prof. Kumbhar S.

### ♦ BIOLOGY
Prof. Nagarale I. M.
Prof. Hange M. M.
Prof. Patil S. S.

### ♦ MATHEMATICS
Prof. Patil N. V.
Prof. Mrs. Pail V. M.
Prof. Patil S. D.
Prof. Shaikh K. G.

### ♦ PHY. EDUCATION
Prof. Veerkar M. J.
Shri. Sajagane S. B.

### ♦ ELECTRONICS
Shri. Mattikali P. B.
Miss. Yadav T. R.

### ♦ I. T. / COMPUTER
Mrs. Gat S. J.
Shri. Jibar Khatib
Shri. Patil Sanjay
Miss. Jaygonde P. R.

### ♦ ENVIRONMENT EDUCATION
Miss. Patil S. B.

### ♦ SANSKRIT
Prof. Surpuse M. B.

